ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
* Dist.Nanded *

ISSN 2319-8648

# Current Global Reviewer

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Editor In Chief

Arun B. Godam

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

# Current Global Reviewer

ISSN 2319-8648

Editor in Chief
Mr. Arun B. Godam

Vol I Issue VIII Year IV ( Half Yearly) May 2018 to Oct - 2018

**Editorial Office :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India.

**Contact :-**

**Arun B. Godam**

**8149668999, 8483959442**

**E-mail :**

hitechresearch11@gmail.com.

Shaurya Publication,
Latur

**Price : Rs. 250/-**

## EXECUTIVE EDITORS

**Dr. Hanumant Mane**
R Guide & Head Dept of Marathi
Shivchatrapati College,
Kalam Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. N J Waghmare**
Res. Guide & Head Dept. of Pali
Govt. Sanatkatai College,
Shivani (M.P.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr U V Panchal**
H.O.D. Dept of Commerce,
Deogiri College
Aurangabad Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai

**Dr M.U. Yusuf**
Assistant Professor,
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

## DEPUTY EDITORS

**B.J. Hirve**
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

**S.M. Bansode**
Dept. of Sociology,
Shri Shiv Shahu Mahavidalaya,
Sarud, Tq. Shahuwadi, Dist. Kolhapur

**Maimanat Jahan Ara**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr. B.T. Lahane**
Principal, Head, Dept. of English,
Sambhajirao Kendre College,
Jalkot, Dist. Latur (M.S.)

www.rjournals.co.in

**CURRENT GLOBAL REVIEWER** ISSN - 23[illegible]9-8648

Half yearly Research Journal

Vol 1 Issue VIII, Ma[illegible]

4

EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Comparative Income Statement of Maharashtra State Agricultural Marketing Board | Dr. Awade N. H.<br>Prof.Kawade V.P | 5-7 |
| 2 | Sustainable Economic Development – A scenario to enhance environmental issues in Indian perspective' | Dr. S. L. Soni | 8-10 |
| 3 | A Study On Shri Kshetra Siddhagiri Math: A Role Model | Prakash T.Waghmare<br>Tushar T. Waghmare | 11-15 |
| 4 | Recommendations Of The mandal Commission for the Other Backward Classes: A Sociological Study | Shri. Bansode S. S. | 16-22 |
| 5 | Issues and Problems : Dalit Literature | Shinde Sachin | 23-25 |
| 6 | Politics of PWP in Maharashtra | Dr. Sanjivan M. Kadam | 26-30 |
| 7 | Psychodynamic theory development in Educational | Dr. Shinde Sushil Shesherao | 31-34 |
| 8 | "प्रेमचन्द की कहानियों में व्यक्त विभिन्न समस्या" | प्राचार्य डॉ. गणपत श्रीपतराव माने | 35-40 |
| 9 | मानवाधिकार संरक्षण के क्षेत्र मे गैर सरकारी संगठनो की भूमिका | माधव शिंदे | 41-45 |
| 10 | शाश्वत विकासाकरीता ग्रामीण महिला सशक्तता साखळी | प्रा.सुरवसे ए.पी. | 46-49 |
| 11 | ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका | प्रा.राठोड एस.के. | 50-56 |
| 12 | श्री. दत्त र. कवठेकर : एक अभ्यास | बिलुरे श्रीदेवी रामचंद्र | 57-60 |
| 13 | महाराष्ट्रातील याढत्या लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांचा तुलनात्मक<br>अभ्यास : विशेष संदर्भ 2001 ते 2011 | प्रा. ज. के. ससाणे | 61-70- |
| 14 | स्वयंसाहाय्यता बचत गट | डॉ. इ.जे. हेळगे | 71-79 |
| 15 | आधुनिक काळातील राजकीय पक्षाचे स्वरूप आणि कार्य | प्रा.डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे | 80-83 |

# आधुनिक काळातील राजकीय पक्षाचे स्वरूप आणि कार्य

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
* Dist.Nanded *

प्रा.डॉ. रत्नाकर बाबुराव लखटे
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
देगलूर महाविद्यालय, देगलूर

15

**Research Paper - Political Sci.**

**प्रस्तावना :**

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये राजकीय पक्ष हे अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतात. लोकशाही आणि लोकशाहीतील राजकीय पक्षांची अनिवार्यता स्पष्ट करतांना विविध विचारवंतानी आपआपली मते व्यक्त केली आहेत. थोडक्यात सांगायचे म्हणजे समुद्रावर जितक्या लाटा नैसर्गिक तितकेच लोकशाहीत राजकीय पक्ष अनिवार्य असतात.१ लोकशाहीला गतिमान करण्याचे कार्य राजकीय पक्ष पार पाडीत असतात यात शंका घेण्याचे कोणतेही कारण नाही. अशा या आधुनिक पक्ष पध्दतीची सुरूवात अठराव्या शतकात इग्लंडमध्ये झाली. इंग्लडच्या राजकीय पक्षपध्दतीचे अनुकरण जगातील इतर देशांनी केले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात लोकशाही प्रधान राज्यकारभारासाठी राजकीय पक्ष आवश्यक मानण्यात येऊ लागले. अशा या आधुनिक काळातील राजकीय पक्षाचे कार्य अत्यंत महत्वाचे मानले जाते. किंबहूना राजकीय प्रक्रियेचे आणि शासन व्यवस्थेचे वास्तववादी अध्ययन करण्यासाठी सुध्दा राजकीय पध्दती व राजकीय पक्षांच्या तत्वप्रणालींचे सुध्दा संशोधनात्मक अध्ययन महत्वाचे ठरते. सांगण्याचा तात्पर्य हा आहे की, आधुनिक काळात राजकीय पक्ष हे राज्यव्यवस्थेचे अभिन्न अंग झाले आहे. प्रत्येक देशात कमीत कमी एक किंवा त्यापेक्षा अधिक संख्येन राजकीय पक्षाचे आस्तित्व आज तरी जगाच्या कानाकोपऱ्यातील सर्वच राष्ट्रांमध्ये दिसून येते. तरी पण राज्यशास्त्रातील किंबहूना राजकारणातील अनेक तत्वतेने (रूसो, जॉर्ज वॉशिंग्टन, जयप्रकाश नारायण) आदी सारख्या महान विचारवंतानी राजकीय पक्षाचे दोष स्पष्ट केले तरीही राजकीय व्यवस्थेमध्ये त्याचे महत्व मात्र मूळीच कमी झाले नाही.३ असेही दिसून येते. एकंदरीत विचार करता आधुनिक काळातील राजकीय पक्ष पध्दतीचे अत्यंत महत्व आहे, पण त्या अगोदर प्रस्तूत शोधनिबंधासाठी पुढीलप्रमाणे संशोधन आराखडा तयार केला आहे.

संशोधनाची व्याप्ती (Scope of The Studey)

प्रस्तूत शोधनिबंधामध्ये आधुनिक काळातील राजकीय पक्षाचे स्वरूप आणि त्यांच्या कार्याबाबचा ओझरता आढावा शोधनिबंधात घेतला आहे.

ISSN : 2319-8648

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

**...धनाची उद्दिष्टे (Objects of Research)**

आधुनिक काळातील राजकीय पक्षाचे स्वरूप स्पष्ट करणे.

राजकीय पक्षांच्या कार्यावर प्रकाश टाकणे.

**...तके (Hypothesis)**

नवीन परिस्थिती व समाजाच्या गरजेनुसार राजकीय पक्षाची ध्येय धोरणे बदलतात.

एखाद्या राजकीय पक्षाचे जे स्वरूप आहे तेच कायम असते असे नव्हे.

राजकीय पक्ष हे राजकीय दृष्टीकोणातून विविध प्रकारचे कार्य करतात.

**...थ्य संकलन (Data Collection)**

प्रस्तूत शोध निबंधासाठी प्रलेखिय साधनांचा वापर करण्यात आला असून शक्यतो प्रकाशित साधनावर भर दिला आहे.

**अभ्यासाची पध्दती (Research Methdology)**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी ग्रंथालयीन अभ्यास पध्दती प्रमाण मानून शोधनिबंधाच्या गरजेप्रमाणे आवश्यक त्या ठिकाणी वर्णनात्मक / विश्लेषनात्मक अभ्यास पध्दतीचा स्वीकार करण्यास आला.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तूत शोधनिबंधासाठी संशोधकाने संशोधन पध्दतीचा वापर करुन शोधनिबंधाच्या अनुषंगाने पुढील बाबींचे विवेचन केले आहे.

आधुनिक काळातील राजकीय पक्षांचे स्वरुप आणि त्यांचे कार्य स्पष्ट करताना प्रथमतः राजकीय पक्षांचा थोडक्यात अर्थ समजून घेणे योग्य राहील. याबाबत एडमंड बर्क असे म्हणतो की, सर्वांनी मान्य केलेल्या विशिष्ट तत्वानुसार संघटीतरित्या प्रयत्न करुन जनतेचे हितसंवर्धन करण्याच्या दृष्टीने एकत्रित आलेल्या व्यक्तीचा संघ म्हणजे राजकीय पक्ष होय. तर गेटेल असे म्हणतो की, "कमी अधिक प्रमाणात संघटीत झालेल्या राजकीय घटक म्हणून कार्य करणाऱ्या, मतदानाच्या हक्काचा उपयोग करुन शासन संस्थेवर नियंत्रण ठेवावे आणि आपल्या सर्वसाधारण धारणांची अंमलबजावणी करावी अशा उद्देशाने एकत्रित आलेल्या नागरिकांचा संघ म्हणजे राजकीय पक्ष होय."४ एडमड बर्क, गेटेल आणि राजकीय पक्षा बाबत विचारवंतानी जी मते व्यक्त केली आहेत, त्यातूनच राजकीय पक्षाचे एकंदरीत स्वरूप आपल्या लक्षात येते. थोडक्यात एकंदरीत विचार करता राजकीय पक्षाची गरज जरी असली तरी एखाद्या राजकीय पक्षांचे जे स्वरूप एकदा निर्माण होईल तेच कायम असते असे मात्र नव्हे. नवीन परिस्थिती नुसार व समाजाच्या गरजेनुसार राजकीय पक्षांच्या संघटनेत ध्येय व धोरणात बरेच बदल घडून येतात. शक्यतो आधुनिक काळातील जे राजकीय पक्ष आहेत ते बहूतांश पक्ष हे सुसंघटीत व शिस्तबध्द दिसतात. विशेषतः अशा सर्वच राजकीय पक्षांची स्वतःची एक यंत्रणा असते. तसेच प्रत्येक राजकीय पक्षाला एक घटना असते. प्रत्येक पक्षाची वार्षिक अधिवेशने भरतात. त्या अधिवेशना...

पक्षाच्या ध्येय धोरणाची आखणी केली जाते. सुरुवातीच्या काळात राजकीय पक्षाच्या संघटना अशा विकसित झाल्या नव्हत्या.५ परंतू आधुनिक काळात पक्षसंरचनेत तिच्या संघटनेलाही अधिक महत्त्व दिले जाते.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

राजकीय पक्षाचे उपरोक्त प्रमाणे जे स्वरूप आहे, शक्यतो ते स्वरूप बदलते असते हे वरील विवेचनावरून आपल्या ही बाब लक्षात येते. तसेच राजकीय पक्षाला राजकीय दृष्टिकोणातून विविध प्रकारचे कार्य करावे लागते. राजकीय पक्ष हे जनतेसमोर निश्चित राजकीय प्रश्न मांडून सभा, छापीलपत्रके, वर्तमानपत्रे यांच्या साह्याने आपल्या धोरणांचा प्रचार करतात. राष्ट्रासमोरील विविध प्रश्नाविषयी राजकीय पक्ष हे आपली बाजू मांडत असतात. राजकीय पक्ष हे जनतेच्या मागण्या व अपेक्षा, सुसंघटीत करतात. एव्हाना ते जनतेचे प्रतिनिधीत्व करतात. लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षाना महत्वपूर्ण स्थान असते. संसदीय शासन व्यवस्थेत तर सत्ताधारी पक्षाप्रमाणेच विरोधीपक्षालाही महत्वाचे असते. निवडणूकीच्या निमित्ताने व अन्य वेळी सुध्दा विविध राजकीय पक्ष आपआपली विचारसरणी जनतेसमोर मांडतात. विशेषत: ज्या लोकांना ज्या राजकीय पक्षाची ध्येय धोरणे, उद्दिष्ट्ये आवडतात अशा राजकीय पक्षांनाच लोक बहूमताने निवडून देतात.६ पण हे बहूमत प्राप्त करण्यासाठी राजकीय पक्षाला वेगवेगळ्या प्रकारचे धोरणात्मक कार्य करावे लागते, अशी कोणती कार्य राजकीय पक्षाला करावी लागतात त्याचे विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

लोकशाहीमध्ये राजकीय पक्षांना अत्यंत महत्वाची कार्य करावी लागतात. राष्ट्रीय विकासाच्या योगदानात राजकीय पक्षाचे कार्य कुणालाही मान्य करावेच लागते. याशिवाय राजकीय प्रशिक्षण देण्याचे महत्वपूर्ण कार्य राजकीय पक्षच करीत असतात. अशा कार्यामध्ये प्रथम क्रमांकाचे पहिले कार्य म्हणजे लोकांना संघटीत करण्याचे महत्वपूर्ण कार्य राजकीय पक्ष करीत असतात. वृत्तपत्रे, प्रचार माध्यमे, याद्वारे प्रसिध्दी मिळवून लोकमत संघटीत करण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करीत असतात. दुसरे महत्वाचे कार्य म्हणजे निवडणूक लढविणे होय. सार्वत्रिक निवडणूकितही एखाद्या राजकीय पक्षाचा पाठींबा घेऊन विविध व्यक्ती उमेदवार म्हणून उभ्या राहतात व निवडूण येतात. निवडणूक प्रचाराला गती आणणे, निवडणुकांचे डावपेच आखून निवडणूक यशस्वी करण्याचा प्रयत्न राजकीय पक्ष करीत असतात.७ राजकीय पक्षाचे तिसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे जनता व सरकार यांचेमध्ये दुवा म्हणून महत्वपूर्ण कार्य करण्याचे काम राजकीय पक्ष करीत असतात. विशेषत: लोकशाहीमध्ये तर दोन प्रकारचे राजकीय पक्ष असतात. यातील एक पक्ष हा सत्तारूढ असतो तर दुसरा पक्ष हा विरोधी पक्ष असतो असे दोन्ही पक्ष सरकार व जनता यांच्यामध्ये योग्य संबंध प्रस्थापित करीत असतात. लोकांना सरकारने केलेल्या कार्याची माहिती देतात. सरकारला जनतेचा पाठिंबा मिळवून देण्याचे काम करतात. विरोधी पक्ष हे

सरकारने काही चूका केल्या आहेत का याची चाचपणी करून झालेल्या चूका लोकाना दाखवून देणे. राजकीय पक्ष हे सरकारवर टिका करतात व सतत जनतेशी संपर्क ठेवित असतात. राजकीय पक्षांची उभारणी किंवा संबंधीत पक्षांची बांधणी करण्याचे काम सुध्दा राजकीय पक्षाला करावे लागते. पक्ष बांधणी करताना कष्टाळू, प्रमाणिक, त्यागी, ध्येयवादी कार्यकर्त्यांचा संच उभारण्याचा प्रयत्न प्रत्येक राजकीय पक्ष करीत असतोच. तळापासून वर पर्यन्त विविध स्तर आणि या स्तरावर काम करणारे कार्यकर्ते राजकीय पक्षाला निर्माण करावे लागतात.८

थोडक्यात राजकीय पक्ष हे अमुर्त शासन व्यवस्थेला मूर्त स्वरूप देतात. तसेच राज्यांच्या योजनांचे, संविधानिक कायद्यांचे व आपल्या पक्षांच्या ध्येय धोरणाचे सत्ता स्थानावरून ते संचालन करतात. राजकीय गटाबाबत किंवा गटनिर्मितीबाबत सर्व प्रश्नांच्या बाबतीत सर्व लोकात एकवाक्यता असते असे नाही, लोकांची मने देशभर विखूरलेली असतात अशा सर्वांना एकत्र आणून, संघटीत करून व राजकीय गट निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्य राजकीय पक्ष करतात. या व्यतिरिक्त राजकीय सामाजिकरण करणे, लोकांना राजकीय सहभाग प्राप्त करून देणे, समस्यांची मांडणी, प्रश्नाना वाचा फोडणे, राजकीय एकात्मता निर्माण करणे. शासनास अधिमान्यता प्राप्त करून देणे, विविध धोरणात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, संसुचनाचे कार्य करणे, सत्ता संपादन करणे, सत्तेचे संचलन करणे, नेतृत्व निर्माण करणे, लोकांच्या सामाजिक व राजकीय गरजांची पुर्तता करणे इ. कार्य आधुनिक काळातील राजकीय पक्षाला करावी लागतात.

## संदर्भ सूची


१) बोराळकर कृ.दी., (१९८९), आधुनिक राजकीय विश्लेषन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद पृ. १५१.

२) प्रा.बापट / इंदापवार, (१९७२), भारतीय संविधान, श्री प्रकाशन, नागपूर पृ. १३८.

३) प्रा.लोटे रा.ज., (१९९५), भारतीय संविधान आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ. १२९.

४) डॉ.जोरगुलवार भूषण, (१९९९), महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शहापुरकर, अहमदपुर पृ. २७६.

५) प्रा.बापट / इंदापवार, पुर्वोक्त पृ. १३९.

६) प्रा.लोटे रा.ज. पुर्वोक्त, पृ. ११७.

७) डॉ.राठी शुभांगी (२०१४), भारताचे शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. पृ. २२३.

८) बोराळकर कृ.दी., (१९९८), राज्यशास्त्र, विद्या बुक्स, पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. १०७


ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded